# 'साय-फाय करंडकच्या पहिल्या आवृत्तीतील विजेत्यांची घोषणा

**पुणे :** आयटी सुरक्षा उपायांचे अग्रगण्य पुरवठादार क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडची सीएसआर शाखा असलेल्या क्विक हील फाऊंडेशनने पुणे पोलिसांच्या सहकार्याने भरत नाट्य मंदिर येथे झालेल्या दिमाखदार सोहळ्यात 'साय-फाय करंडक २०१७' च्या पहिल्या आवृत्तीच्या विजेत्यांची घोषणा केली. विजेत्यांना क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर, क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे सह व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य तंत्रज्ञान अधिकारी संजय काटकर, पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे विभाग (ईओडब्ल्यू) आणि सायबर क्राईम पोलिस उपायुक्त सुधीर हिरेमठ आणि एक्सप्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सुयश टिळक, पर्ण पेठे, गिरीश जोशी और सुनील सुकथनकर यांसारखे प्रसिद्ध चित्रपट आणि रंगमंच कलावंत उपस्थित होते.